जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JUL 2025 पुढारी

# सिनेमाच्या फ्रेममध्ये जीवन बदलण्याची ताकद

## डॉ. पटेल; विद्यापीठात बी.ए. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांशी मुक्तसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चित्रपट ही सर्जनशील बाब आहे. या क्षेत्रात आज तंत्रज्ञानात्मक बदल गतीने होत आहेत. ही स्थित्यंतरे होत राहणार, आव्हाने बदलणार मात्र गोष्ट सांगणे हा त्याचा मूळ गाभा मात्र कायम राहणार आहे. सिनेमाच्या फ्रेममध्ये जीवन बदलून टाकण्याची ताकद आहे. ती फ्रेम पूर्णांशाने समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ निमति-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागात बी.ए. (फिल्म मेकिंग) च्या विद्यार्थ्यांसह संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित मुक्तसंवाद कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे प्रमुख उपस्थित होते. डॉ. पटेल म्हणाले, आज चित्रपटसृष्टीसमोर तंत्रज्ञानासह मोबाईल, ओटीटी अशी अनेक आव्हाने उभी आहेत. चित्रपट क्षेत्रात स्टोरी टेलिंगला सर्वाधिक महत्त्व आहे. या माध्यमाद्वारे चांगली गोष्ट सांगितली गेल्यास ती आवर्जून पाहणारे प्रेक्षक लाभतात.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बी.ए. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांशी मुक्तसंवाद साधताना ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल. समवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. शिवाजी जाधव.**

### 'कोल्हापूर स्कूल'चे पुनरुज्जीवन व्हावे

भारतीय चित्रपटसृष्टीच्या जडणघडणीत आणि विकासात कोल्हापूरच्या कलाकारांचे महान योगदान आहे. त्यांच्या शैलीने काम करणाऱ्या येथील कलाकारांना 'कोल्हापूर स्कूल'म्हणून ओळखले जाते. येथील कार्यशैली, मापदंड, तंत्रज्ञान चित्रपटसृष्टीसाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे 'कोल्हापूर स्कूल'चे पुनरुज्जीवन व्हावे. येथील कलाकारांनी जागतिक स्तरावर ठसा उमटवावा, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, चित्रपटसृष्टीत चांगली कारकीर्द घडवू पाहणाऱ्या क्षमतावान विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम पश्चिम महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट व्हावा, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व साधनसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण पांढरे यांनी परिचय करून दिला. माधुरी वाघमोडे यांनी आभार मानले.

तरूण भारत



कोल्हापूर :बी. ए. फिल्म मेकिंग विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल. सोबत डॉ. शिवाजी जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. सुनिलकुमार लवटे.

# चित्रपट क्षेत्रातील स्थित्यंतरे स्वीकारली पाहिजेत

प्रतिनिधी
कोल्हापूर

चित्रपट, नाटकात काळानुरूप तंत्रज्ञान बदलत चालले आहे. चित्रपट क्षेत्रात नवीन आव्हाने येत आहेत. ही स्थित्यंतरे स्विकारली पाहिजेत, असे आवाहन ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी विद्यार्थ्यांना केले आहे.

शिवाजी विद्यापीठातील बी. ए. फिल्म मेकिंग विभागातील विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधताना ते बोलत होते. मास कम्युनिकेशन अधिविभागातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. पटेल म्हणाले, फिल्म मेकिंगचे शिक्षण घेताना प्रत्यक्ष नाटक करणाऱ्या अनुभवी लोकांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. शिक्षणाबरोबर अनुभव अतिशय महत्वाचा असतो. कार्यशाळांच्या माध्यमातून अनुभवी लोकांना बोलावून विद्यार्थ्यांना कॅमेरा शिकवा. यातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल. चित्रपट जादू आहे, त्यामुळे निसर्ग, नदी, चित्रपटात आली पाहिजे. चित्रपटात एआय तंत्रज्ञान येईल यात शंका नाही. परंतू प्रेमकथा त्याच राहणार आहेत. त्यामुळे पारंपारिक पध्दतीने प्रात्यक्षिक झाले पाहिजे.

## कोल्हापूर स्कूलचा दबदबा वाढला पाहिजे

कोल्हापूर स्कूलचा चित्रपट सृष्टीतील संपर्क कमी झाला आहे. परंतू कोल्हापूरचे तंत्रज्ञ, कलाकार अतिशय हुशार आहेत. म्हणूनच येथील चित्रपटांनी जगभर आपले स्थान निर्माण केले आहे. पुर्वीप्रमाणेच तरूणाईने कोल्हापूर स्कूलचा दबदबा वाढवला पाहिजे, असे आवाहन डॉ. पटेल यांनी विद्यार्थ्यांना केले.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे फिल्म मेकिंग अभ्यासक्रमात बदल केले जातील. चित्रपटांचा संग्रह केला जाईल, त्यासाठी दोन दिवसात विभागाने कुलगुरू कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा.

विभागप्रमुख डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनिलकुमार लवटे, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. अलोक जत्राटकर, प्रा. अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JUL 2025
पुण्यनगरी

# कितीही स्थित्यंतरे आली तरी चित्रपटाचे 'स्टोरीटेलिंग' कायमच

## – डॉ. जब्बार पटेल

कोल्हापूर : प्रतिनिधी

चित्रपट ही अत्यंत सर्जनशील बाब आहे. या क्षेत्रात आज तंत्रज्ञानात्मक बदल गतीने होत आहेत. ही स्थित्यंतरे होत राहणार, आव्हाने बदलणार; मात्र गोष्ट सांगणे हा त्याचा मूळ गाभा मात्र कायम राहणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागात बी.ए. (फिल्म मेकिंग), संगीत व नाट्यशास्त्र यासह अन्य विभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी व रसिकांसमवेत मुक्त संवादात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पटेल म्हणाले, आज चित्रपटसृष्टीसमोर तंत्रज्ञानासह मोबाईल, ओटीटी अशी अनेक आव्हाने आहेत. हे होतच राहणार; मात्र चित्रपट क्षेत्रात 'स्टोरीटेलिंग'ला सर्वाधिक महत्त्व आहे. या माध्यमाद्वारे चांगली गोष्ट सांगितली गेल्यास ती आवर्जून पाहणारे प्रेक्षकही लाभतात. हे 'स्टोरीटेलिंग' एक तर साहित्यातून येते अगर अनुभवातून येते. त्यासाठी सकस वाचन व सातत्यपूर्ण काम करत राहणे आवश्यक आहे. त्या खालोखाल दिग्दर्शकाचे महत्त्व असते. तो गोष्ट कशी



कोल्हापूर : विद्यार्थ्यांसमवेत मुक्त संवाद साधताना डॉ. जब्बार पटेल.

मांडतो, हेसुद्धा महत्त्वाचे ठरते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, चित्रपटसृष्टीत चांगली कारकीर्द घडवू पाहणाऱ्या क्षमतावान विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम पश्चिम महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट व्हावा, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असून, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व साधन सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यावेळी डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. प्रवीण पांढरे यांनी परिचय करून दिला. साक्षी वायमोडे यांनी आभार मानले.

### 'कोल्हापूर स्कूल'चे पुनरुज्जीवन व्हावे

भारतीय चित्रपट सृष्टीच्या जडणघडणीत आणि विकासात कोल्हापूरच्या कलाकारांचे महान योगदान आहे. त्यांच्या शैलीने काम करणाऱ्या येथील कलाकारांना 'कोल्हापूर स्कूल' म्हणून ओळखले जाते. इथली कार्यशैली, मापदंड, तंत्रज्ञान चित्रपट सृष्टीसाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे या 'कोल्हापूर स्कूल'चे पुनरुज्जीवन व्हावे आणि येथील कलाकारांनी जागतिक स्तरावर ठसा उमटवावा. शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमामुळे कोल्हापूर स्कूलला निश्चितपणे ऊर्जितावस्था प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

19 JUL 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कोल्हापूर स्कूल'चे पुनरुज्जीवन व्हावे

## डॉ. जब्बार पटेल : विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी साधला संवाद

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : 'भारतीय चित्रपटसृष्टीच्या जडणघडणीत आणि विकासात कोल्हापूरच्या कलाकारांचे महान योगदान आहे. त्यांच्या शैलीने काम करणाऱ्या येथील कलाकारांना 'कोल्हापूर स्कूल' म्हणून ओळखले जाते. इथली कार्यशैली, मापदंड, तंत्रज्ञान चित्रपटसृष्टीसाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे या 'कोल्हापूर स्कूल'चे पुनरुज्जीवन व्हावे', अशी अपेक्षा ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी आज येथे व्यक्त केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बी. ए. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांसमवेत मुक्त संवाद साधताना ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल. यावेळी डावीकडून डॉ. शिवाजी जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. सुनीलकुमार लवटे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागात बी.ए. (फिल्म मेकिंग)च्या विद्यार्थ्यांसह संगीत व नाट्यशास्त्र तसेच अन्य विभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि रसिक नागरिकांसमवेत डॉ. पटेल यांनी मुक्त संवाद साधला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पटेल म्हणाले, 'कोल्हापुरातील कलाकारांनी जागतिक स्तरावर ठसा उमटवावा. विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमामुळे कोल्हापूर स्कूलला निश्चितपणे ऊर्जितावस्था प्राप्त होईल. चित्रपट ही अत्यंत सर्जनशील बाब आहे. या क्षेत्रात आज तंत्रज्ञानात्मक बदल गतीने होत आहेत. ही स्थित्यंतरे होत राहणार, आव्हाने बदलणार; मात्र गोष्ट सांगणे हा त्याचा मूळ गाभा मात्र कायम राहणार आहे. आज चित्रपटसृष्टीसमोर तंत्रज्ञानासह मोबाईल, ओटीटी अशी अनेक आव्हाने उभी आहेत. हे होतच राहणार. मात्र, चित्रपटाच्या क्षेत्रात स्टोरी टेलिंगला सर्वाधिक महत्त्व आहे. या माध्यमाद्वारे चांगली गोष्ट सांगितली गेल्यास ती आवर्जून पाहणारे प्रेक्षकही लाभतात. हे स्टोरी टेलिंग एक तर साहित्यातून येते अगर अनुभवातून येते. त्यासाठी सकस वाचन, सातत्यपूर्ण काम करीत राहणे आवश्यक आहे. विद्यापीठाने जगभरातील अभिजात चित्रपटांचे संकलन करून ते विद्यार्थ्यांना पाहण्यास उपलब्ध करावेत. चित्रपटविषयक ग्रंथांचा संग्रह निर्माण करावा.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'चित्रपटसृष्टीत चांगली कारकीर्द घडवू पाहणाऱ्या क्षमतावान विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम पश्चिम महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट व्हावा, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असून, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व साधनसुविधा उपलब्ध करून द्याव्यात.' डॉ. पटेल यांच्या सूचनेनुसार ग्रंथ आणि चित्रपट यांचे संकलनही करण्यात येईल, याची ग्वाही त्यांनी दिली. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण पांढरे यांनी परिचय करून दिला. साक्षी वाघमोडे यांनी आभार मानले.

सकाळ

# विद्यापीठाला दोन लाखांची देणगी

कोल्हापूर, ता. १८ : लीला बापूसाहेब पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या विश्वस्तांकडून शिवाजी विद्यापीठाला दोन लाख रुपयांची देणगी देण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याकडे धनादेश दिला. या रकमेच्या व्याजातून एम. एड्. अभ्यासक्रमाच्या परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक दिले जाणार आहे. ट्रस्टचे विश्वस्त डॉ. उदयप्रकाश संत, सचिव सुचिता पडळकर, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव तेजस्विनी भूतकर, अधीक्षक उमेश भोसले उपस्थित होते.

19 JUL 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवामुळे कलागुणांना वाव मिळतो

## प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे : डीकेएएससीमध्ये युवा महोत्सव कार्यशाळा

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देऊन समृद्ध बनवणं ही महत्त्वाची बाब आहे. विद्यापीठाच्या युवा महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. याच विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील विद्यार्थी कलाकार आपल्या कलेचा वारसा पुढे चालवत असतात. आणि यातूनच मोठे कलाकार जन्माला येतात. यासाठी युवा महोत्सव विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा भाग आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि डीकेएएससी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय एकदिवसीय युवा महोत्सव माहिती कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ टी. एम. चौगुले, युवा महोत्सव कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्यावतीने या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

डॉ. टी. एम. चौगुले यांनी, जिल्हास्तरीय आणि मध्यवर्ती युवा महोत्सवांच्या माध्यमातून महाविद्यालयातील कलाकारांना संधी मिळतेच. परंतु यातून विद्यापीठाची कलाकारांची चांगली मोट बांधून इंद्रधनुष्य सारख्या मोठ्या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाने मोठे यश मिळावे हे आपले प्रत्येकवर्षी स्वप्न असते, असे सांगितले.

डॉ. आर. एच. अतिग्रे , श्रीमती एस. टी. आडके यांनी मार्गदर्शन केले. जिजाऊ सांस्कृतिक भवन येथे उद्घाटन सत्र झाल्यानंतर दिवसभर महाविद्यालयामध्ये विविध कला प्रकारातील तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थी कलाकारांना मार्गदर्शन केले. नृत्य, संगीत, नाट्य ललित आणि वांग्मय या विविध कला प्रकारांमध्ये मार्गदर्शन झालेल्या या कार्यशाळेत जिल्ह्यातील ४० महाविद्यालयातील २१५ विद्यार्थी आणि ८० शिक्षक असे ३१५ विद्यार्थी शिक्षक सहभागी झाले होते.

स्वागत प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी केले. प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पी. के वाघमारे यांनी केले. यावेळी प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी पाटील, प्रबंधक आर. बी. जोग उपस्थित होते. आभार डॉ. ए. एच. वोगुलवार यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले.



इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये एकदिवसीय युवा महोत्सव कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. टी. एम. चौगुले, डॉ. आर. एच. अतिग्रे, प्राचार्य डॉ. एस. के. खाडे.

पुढारी

# विद्यापीठाकडून ८१८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च- एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ८१८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी पोस्ट ग्रज्युएट डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी या अभ्यासक्रमाची परीक्षा झाली. परीक्षेला २८ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १८ रोजी बीसीए, पीजी डिप्लोमा इन बायो-इन्फॉर्मेटिक्स आदी तीन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी दिली.